# जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर
## खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर
## नोंदनी क्रमांक – ई-3342/2017 दिनांक 27/11/2017


आदेश क्र. जिखप्र/प्रमा-कौशल्य विकास/456/2026

दिनांक-27 /02/2026

**प्रशासकीय मान्यता व निधी वितरण आदेश**

विषय- प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY), जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर अंतर्गत "कौशल्य विकास आणि उपजिविका निर्मिती" या शिर्षकाखाली तालुका पारशिवनी व तालुका सावनेर येथील महिला ग्रामसंघाना स्वंय रोजगारासाठी विविध व्यवसायाकरीता वाहन उपलब्ध करून देणे या कामाला प्रशासकीय मान्यता व निधी वितरण.

वाचा-

1. भारत सरकार, खाण मंत्रालय, प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY) यांचे सुधारित मार्गदर्शक सुचना दिनांक 15/01/2024
2. महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग शासन निर्णय क्र. डीएमएफ-0124/प्र.क्र.10/उ-9 मंत्रालय, मुंबई-32 दिनांक 11/10/2024
3. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचे पत्र क्र. जा.क्र. जिग्राविय/जि.प.नाग/ उपजिविका/810/2025 दिनांक 29/12/2025
4. कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणी पूरवठा जिल्हा परिषद, नागपूर यांचे तांत्रिक मान्यता आदेश दिनांक 12/12/2025
5. मा. जिल्हाधिकारी महोदय यांचे दिनांक27 /02/2026 रोजीच्या मंजुर टिपणीनूसार

ज्याअर्थी, संदर्भ क्र. 3 पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर (जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, नागपूर) यांनी प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना (PMKKKY), जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर अंतर्गत "कौशल्य विकास आणि उपजिविका निर्मिती" या शिर्षकाखाली मौजा कोलितमारा/मेहेकेपार, भागेमारी, परसोडी तालुका पारशिवनी व मौजा चणकापूर तालुका सावनेर येथील महिला ग्रामसंघाना स्वंय रोजगारासाठी विविध व्यवसायाकरीता वाहन उपलब्ध करून देणे या कामाकरीता अंदाजित किंमत **रू.** 48,02,428/- **(अक्षरी रु. अठ्ठेचाळिस लक्ष दोन हजार चारशे अठ्ठाविस फक्त)** इतक्या रकमेकचा प्रस्ताव या कार्यालयात सादर केलेला आहे. तसेच संदर्भ क्र. 4 चे तांत्रिक मान्यता आदेशानूसार कार्यकारी अभियंता, ग्रामिण पाणी पूरवठा जिल्हा परिषद, नागपूर यांचे यांत्रिक उपविभागाने सदर प्रस्तावास तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे.

संदर्भ क्र. 5 च्या टिपणीनुसार मा. जिल्हाधिकारी महोदयांनी सदर प्रस्तावास मंजूरी प्रदान केलेली आहे.

**नियोजित कामांचे विवरण:-**

| अ. क्र. | तालुका | मौजा | कार्यान्वित यंत्रणा | कामाचे नाव | प्रशासकीय मान्यता रक्कम | या आदेशान्वये वितरीत 20% निधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पारशिवनी | कोलितमारा /मेहेकेपार | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास | फुड खाद्य व्यवसायाकरीता वाहन खरेदीबाबत प्रस्ताव वाहन प्रकल्प | 959468 | 191894 | **प्रत्यक्ष बाधित क्षेत्र** (उच्च प्राथम्य बाबी) |
| 2 | पारशिवनी | भागेमारी | | फुड खाद्य व्यवसायाकरीता वाहन खरेदीबाबत प्रस्ताव वाहन प्रकल्प | 1566163 | 313233 | **प्रत्यक्ष बाधित क्षेत्र** (उच्च प्राथम्य बाबी) |

या आदेशातील परिच्छेद 1 ते 34 मधील अटीच्या अधिन राहून कामे करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित यंत्रणेची राहील.

सदर आदेशान्वये मंजूर निधी **रु.** 9,60,486/- **(अक्षरी रु. नऊ लक्ष साठ हजार चारशे छयाएंशी फक्त)** प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, नागपूर (DRDA Nagpur) यांचे प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा, नागपूर (DRDA Nagpur) यांचे Bank Of Maharastra, BRANCH-VIDARBHA IRRIGATION DEV CORPN (1321) CIVIL LINE SA BHAVAN, Saving A/c CONVERGENCE SCHEME DRDA NAGPUR, A/C No. 60465598208 IFSC Code MAHB0001321 मध्ये आर.टी.जी.एस द्वारा वितरीत करण्यात येत आहे.

(डॉ. विपीन)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
नियामक परिषद, जिल्हा खनिज प्रतिष्ठान,
नागपूर

प्रत:-

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर

प्रतिलिपी:-

प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा (DRDA Nagpur) यांना माहिती व पुढील कार्यवाहिस्तव अग्रेषित.

(डॉ. विपीन)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
नियामक परिषद, जिल्हा खनिज प्रतिष्ठान,
नागपूर